**सेशन केस नं. २०६/२०२१**
**निशाणी क्र. ६१ /क**

<u>अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ३** ची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव — वैशाली विकास राजपाल.
वय — ४१ वर्षे, व्यवसाय — नोकरी
रा. पन्हाळा पोलिस ठाणे, पन्हाळा

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. पोवार**

१. दिनांक ०३/०३/२०२१ इ।। रोजी मी शाहूवाडी पोलिस स्टेशनला पोर्लिस नाईक या पदावर काय रत होती. त्यावेळी मी शाहूवाडी पोलिस स्टेशनमध्ये रहायचे. मी माझे पती व मुलांसोबत राहायचे. त्यादिवशी माझ्याकडे क्राईम दप्तरचा चार्ज होता. त्यादिवशी दुपारी ०१.३० वाजणेच्या सुमारास मी व माझे पती जेवण घेत होतो. त्यावेळी आमचे घराचे मागून कोणीतरी या, धरा असा आवाज येत होता. त्यानंतर आम्ही दोघेही घराचे पाठीमागे गेलो. त्यावेळी तेथे बांबळे हवालदार होते. त्यांचे डोकेतून रक्त येत होते. त्यांचेसोबत दिपक चौगुले पोलिस होते. त्याठिकाणी आरोपी आलम शेख व ते दोघे अशी तिघांमध्ये झटापट चालू होती. आम्ही दोघांनी आलम शेखला धरले. मी लगेच पोलिसांनी फोन लावून गाडी आणणेस सांगितले. मी पोलिसांना असे सांगितले की, आरोपी येथे मिळालेला आहे. पोलिसांची गाडी आली व आरोपीला पोलिस स्टेशनला घेवून गेलो. मी आलम शेखला ओळखते. त्याच्या ओळखीबद्दल वाद नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. न्यायालयात सुध्दा माझा जबाब नोंदवणेत आलेला होता. आता मला माझा जबाब दाखविला. तो तोच आहे. त्याला **निशाणी क्र. ६२** देणेत आले.

सरतपास संपला.

<u>**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे श्री. बी. ए. सोनुले वकील यांचेतर्फे**</u>

२. मी सन २००५ पासून नोकरी करीत आहे. दिनांक

०२/०३/२०२१ इ।। रोजी मी पोलिस स्टेशनला हजर होतो. त्यादिवशी माझ्याकडे क्राईम दप्तरचे कर्तव्य होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी आलम शेख त्याचा अपघात झालेमुळे रिपोर्ट द्यायला पोलिस स्टेशनला आला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो जखमी अवस्थेत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याला जखमा होत्या म्हणून त्याला पोलिसांनी दवाखान्यात भर्ती केले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२/०३/२०२१ इ।। रोजी पोलिस स्टेशनची तपासणी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी तपासणीमुळे आमची लगबघ चालू होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपी क्र. १ ची तक्रार पोलिस स्टेशनने घेतली नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०३/२०२१ इ।। रोजी आरोपी क्र. १ दवाखान्यात भर्ती होता म्हणून पोलिस स्टेशनचे कर्मचारी त्यास आणणेसाठी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी कोरोना असलेमुळे आरोपीला कोर्टात व्ही.सी. वरून हजर करायचे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीने त्याला मारहाणीची तक्रार कोर्टाला दिली होती. हे मला माहित नाही की, कोर्टाने पोलिसांना आदेश दिले होते की त्याला त्याची तक्रार देणेसाठी कोर्टात हजर करावे.

४. आमच्या नोकरीमध्ये जेवणाच्या सुट्टीची वेळ नसते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हांला वरिष्ठांच्या आदेशाशिवाय पोलिस स्टेशन सोडता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बांबळे माझे सहकर्मचारी होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस स्टेशनच्या आजूबाजूला शासकिय कार्यालये आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या भागात नेहमी लोकांची वर्दळ असते. हे मला माहित नाही की, दिनांक २७/०४/२०२१ इ।। रोजी इतर पोलिस कर्मचा–यांचे सुध्दा न्यायालयात जबाब नोंदवणेत आले. आता मला निशाणी क्र. ६२ जबाब दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, बांबळे सोबत चौगुले होते असे नमूद नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, बांबळे माझे सहकारी असलेमुळे त्यांना

मारहाण झाली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यादिवशी ती घटना बघितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे श्री. घोरपडे वकील यांचेतर्फे**

६. हे म्हणणे खरे आहे की, संभाजी विठ्ठल पाटील हे माझे सोबत त्यावेळी त्या पोलिस स्टेशनमध्ये नेमणूकीस होते. हे मला सांगता येणार नाही की, संभाजी पाटीलने या आरोपी विरूध्द तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपींना कोर्टात हजर करणेचे कोणतेच कारण नव्हते. या आरोपींना दवाखान्यात नेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले होते.

७. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस स्टेशन हालचाल रजिस्टर असते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेबद्दल खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना मदत करणेसाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, वा. दा.का. दा.

सदरचा जबाब माझ्यासमक्ष नोंदणीकृत करणेत आला आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ASHISH MANOHAR PATIL
Date: 2026.08.05 16:57:32 +0530

दिनांक – ०४/०८/२०२६

**(आ. म. पाटील)**
सत्र न्यायाधीश, कोल्हापूर